# • विज्ञान प्रदर्शन •

उदेदूश :- १) साध्या, सोप्या आणि स्वतः तयार केलेल्या उपकरणांच्या निर्मितीपासून विधायक दृष्टिकोनात्मकविचार आणि संशोषन प्रवृत्तीचा विकास होण्यास मोलाची मदत होते.

२) समाजाशी असलेल्या विज्ञानाचा सहसंबंध मुलांच्या लक्षात येतो. व त्यातून सामाजिक जबाबदारीची जाणीव होते. व त्यामुळे जनसामान्यपर्यंत विज्ञान लोकप्रिय करता

३) समस्यांचे निराकरण करण्याचीप्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्येवाढीस

४) किशोन व तरूण वयातील मुलांमध्ये विज्ञाननिष्ठा व वैज्ञानिक दृष्टिकोननिर्माण होण्यास मदत होते.

५) समूहनिष्ठा व सौदर्यदृष्टी वाढीस लागते.

**योजनेचे स्वरूप** :- राष्ट्रीय शैक्षणिक संशोषन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली ही संस्था १९७१ पासून तालुका पातळीपासून राष्ट्रीयस्वरापर्यंत विज्ञान प्रदर्शन आयोजित करते. सन १९८८ पासून या प्रदर्शनांचे " बालकांकरिता जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन " असे नामभिदान करण्यात आले दरवर्षी विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय राष्ट्राची निकड आणि समाजातील सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेवून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचेद्वारे निश्चित केला जातो. दरवर्षी विज्ञान प्रदर्शनाचा विषय बदलत असला तरी बालवैज्ञानिकांना कृतिप्रवण करणाराविषय निर्धारीत करण्यात येत असतो. मात्र त्या विषयाची मध्यवर्ती कल्पना विज्ञान आणि तंत्रज्ञानाला अनुसरून असते. राज्यस्तरीय यविज्ञान प्रदर्शनाची सुरूवात १९७५ पासून झाली असून आजपर्यंत महाराष्ट्र राज्यात ३७ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शने आणि माध्य. शिक्षकांसाठी शै. साहित्य निर्मितीची १६ प्रदर्शने संपन्न झाली. अशा प्रकारची विज्ञान प्रदर्शने तालुका/शहर/जिल्हा पातळीपर्यंत अयोजित केली जातात.